**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२५/२०२१**
सना वि. वसीम व इतर
**निशाणी क्र.०१**

**CNR No.MHNS170007732021**

अर्ज फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ९७ नुसार जरीन व खिजरा यांचा शोध घेवुन त्यांचा अर्जदारास ताबा मिळणेकरीता आहे.

२. अर्ज, शपथपत्र, म्हणणे नि.क्र.८, त्यासोबतचे शपथपत्र व कागदपत्राचे अवलोकन केले.

३. अर्जदाराकरीता श्री ए.बी. आहेर, विदवान विधिज्ञ व सामनेवाला यांचेकरीता श्री टी.ए. शेख, विदवान विधिज्ञ यांना ऐकले.

४. अर्जामध्ये सामनेवाला हे अर्जदाराचे पती, सासरे व सासु असल्याने प्रथमदर्शनी गुन्हा घडल्याचे दिसुन न आल्याने व नातेसंबंध विचारात घेता सामनेवाला यांना नोटीसा काढल्या होत्या. त्यानंतर सामनेवाला यांनी नि.क्र.८ वर रितसर म्हणणे सादर केलेले आहे.

५. थोडक्यात अर्जदाराचे म्हणणेप्रमाणे मुली खिजरा, वय ०४ वर्षे व जरीन, वय ०९ वर्षे यांना सामनेवाले हे दि.२६/०९/२०२१ रोजी अर्जदाराला नांदवतो असे सांगुन त्यांचेसोबत घेवुन गेले. त्यानंतर अर्जदारास नांदविणेस नकार दिला. अर्जदाराचे वतीने मुलींसाठी वारंवार संपर्क केला असता सामनेवाले यांनी प्रतिसाद दिला नाही. सामनेवाला क्र. १ ने दुसरे लग्न केले आहे. युक्तीवादामध्ये मुलींना सामनेवाला यांनी

डांबुन ठेवल्याचे कथन केले.

६. सामनेवाले यांचे थोडक्यात कथन असे की, खिजरा हीचे वय सव्वा पाच वर्षे व जरीन हीचे पावने दहा वर्षे वय आहे. सदर मुली हया अर्जदार त्यांना सोडुन गेली तेव्हापासुनच सामनेवाले यांचेकडे राहत आहे. ते त्यांना प्रेमाने वागवत आहे. वडील नैसर्गिक पालक आहेत त्यांनी डांबुन ठेवण्याचे कारण नाही. युक्तीवादा दरम्यान सामनेवालेतर्फे सांगणेत आले की, अर्जामध्ये मुलींना डांबुन ठेवलेबाबत कुठेही उल्लेख नाही. मुलींच्या ताब्यासाठी चुकीच्या पध्दतीने अर्ज दाखल केलेला आहे. ताब्याकरीता जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल करण्याचा योग्य मार्ग आहे.

७. प्रकरणात खिजरा हीचे जन्म प्रमाणपत्र दाखल आहे. त्याप्रमाणे तिचा जन्म दि.२०/०९/२०१६ रोजी झाला आहे. यावरुन ती अर्जदाराचे म्हणणेप्रमाणे ती चार वर्षाची नसुन पाच वर्षापेक्षा मोठी आहे. सामनेवाला क्र.१ हा नमुद मुलींचा पिता असलेबाबत वाद नाही. दोन्ही बाजुंचे कथन व समोरील प्रकरण पाहता कोणत्याही दृष्टीने फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ९७ नुसार कोणताही गुन्हा घडल्याचे दिसुन येत नाही. मुली सामनेवाला क्र.१ नैसर्गिक पालनकर्ता या नात्याने त्याचे ताब्यात होत्या. अर्जदार मुलींचा ताबा मिळणेकरीता रितसरपणे योग्य त्या सक्षम न्यायालयात अर्ज दाखल करु शकते. अशा परिस्थितीमध्ये अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे, करिता खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/—

दिनांक ०५/०१/२०२२

( श.गि.दुबाले )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर व
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदगाव.